मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# फुलांची आकर्षक आरास अन् विद्युत रोषणाई

## समाजप्रबोधनासह कलात्मक मंदिरे : राजवाडे अन् महाल आकर्षणाचे केंद्रबिंदू








**पिंपरी | मनीषा थोरात-पिसाळ**

परिसरातील अनेक गणेश मंडळाचे महोत्सवी वर्ष असल्यामुळे त्यांनी समाजप्रबोधनासह फुलांची आकर्षक आरास, विद्युत रोषणाई, कलात्मक मंदिरे, राजवाडे उभारण्यावर भर दिला आहे. फुलांच्या आकर्षक सजावटीसह वैविध्यपूर्ण शैक्षणिक, सामाजिक, वैज्ञानिक उपक्रमांनी समाज प्रबोधनही केले जात आहे. एलईडीद्वारे स्पेसमधील अंतराळयान, अंतराळवीर, महाल, पाण्याचे कारंजे, पौराणिक, देखाव्यांबरोबरच प्रबोधनात्मक देखावेही मंडळांनी सादर केले आहेत. शिवशंभो प्रतिष्ठानने साकारले राजस्थानी शैलीतील कलात्मक मंदिर २३ वे वर्षे मोशीतील देहू-आळंदी बीआरटीएस रस्त्यावरील बारणे वस्ती येथील शिवशंभो प्रतिष्ठानचे हे २३ वे वर्षे आहे. दरवर्षी आकर्षक भव्यमंदिर अन् राजवाड्यांचा देखावा उभारला जातो. यंदाही कलात्मक मंदिर साकारले आहे. राजस्थान येथील भव्य अशा मंदिराची प्रतिकृती उभारण्यात आली आहे. तसेच आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे. उद्योजक संतोष बारणे हे मंडळाचे अध्यक्ष असून शिवाजी बारणे हे उपाध्यक्ष तर सचिन बारणे हे सचिव आहेत. राजस्थानी शैलीतील कलात्मक मंदिर हे आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरत आहे. आकर्षक विद्युत रोषणाई येथील जय भारत चौकातील जय भारत प्रतिष्ठान या मंडळाने भव्य गणेश मूर्तीची स्थापना केली असून फुलांची आकर्षक सजावट आणि विद्युत रोषणाई केली आहे. शैक्षणिक, सामाजिक कार्यक्रम श्री कॉलनी येथील श्री नागेश्वर प्रतिष्ठान, नागेश्वरनगर कॉलनी क्र. २ येथील मंडळाने भौगोलिक देखाव्यावर भर दिला असून चंद्रावर बसलेल्या भव्य गणेश मूर्तीची स्थापना केली आहे. विविध शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

(उर्वरित पान २ वर)

# अजित गव्हाणे यांनी आरोग्य यंत्रणेला केले जागे

## भोसरी सेक्टर 12 मध्ये धुरीकरण, 7 हजार रहिवासीयांना दिलासानागरिकांच्या समस्या



**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात डेंगू, चिकनगुनिया, झिका आणि मलेरियाची साथ सुरू आहे. भोसरी येथील सेक्टर 12 या भागात रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याबाबत नागरिकांच्या तक्रारी येत होत्या. येथे तातडीने धुरीकरण करण्याची गरज होती. नागरिकांची ही गरज लक्षात घेऊन स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी आरोग्य यंत्रणेला जागे केले. गव्हाणे यांच्या पुढाकारामुळे आरोग्य यंत्रणेने तात्काळ दखल घेत या भागात धुरीकरण केले. यामुळे सेक्टर 12 या भागातील ७ हजार रहिवासीयांना दिलासा मिळाला आहे.

याबाबत अजित गव्हाणे म्हणाले, पीएमआरडीएतर्फे स्पाईन रस्त्यालगत उभारण्यात आलेल्या भोसरी सेक्टर १२ येथील गृह प्रकल्पातील सोसायट्यांमध्ये डेंगू, मलेरिया, झिका,चिकनगुनिया यासारख्या कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव गेल्या महिन्याभरापासून वाढला आहे. याबाबत पालिकेकडून योग्य उपाय योजना केल्या जात नसल्याच्या नागरिकांच्या तक्रारी होत्या. महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून तपासणी मोहीम हाती घेतली जाते. मात्र त्यानंतर या आजारांना आळा घालण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना केली जात नाही. यामुळे येथे रोगांचा प्रादुर्भाव प्रचंड प्रमाणात वाढला आहे. तपासणी मोहीम करणे, नागरिकांना नोटिसा बजावणे. एवढेच सोपस्कार महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून पार पाडले जातात अशा नागरिकांच्या तक्रारी होत्या.

नागरिकांनी याबाबत स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांच्याकडे तक्रार केली. या भागांमध्ये रुग्णांची संख्या पाहता तातडीने धुरीकरण करावे अशी नागरिकांची मागणी लक्षात घेऊन तात्काळ गव्हाणे यांनी महापालिकेच्या आरोग्य यंत्रणेशी चर्चा करून धुरीकरण करण्यात यावे अशी सूचना देखील त्यांनी केली होती. त्यांच्या सूचनेची दखल घेऊन महापालिकेने या भागामध्ये धुरीकरण सुरू केले असून दररोज तीन इमारतीमध्ये धुरीकरण करण्यात येणार आहे. या भागात साधारण 7 हजार नागरिक राहतात. कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव धुरीकरण केल्यानंतर कमी होणार असल्यामुळे या नागरिकांना दिलासा मिळणार असल्याचे अजित गव्हाणे यांनी सांगितले.

# शिवार चौकातील सर्कल हटवला

## वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी नाना काटे यांचा पुढाकार



**पिंपरी | प्रतिनिधी**

प्रभाग क्र.२८ रहाटणी, पिंपळे सौदागर येथील शिवार चौक हा नाशिक फाटा ते हिंजवडी बीआरटीएस रस्त्यावरील मुख्य चौक असुन शहरातील व परिसरातील नागरिकांना येण्या जाण्यास हा रस्ता सोयीस्कर असुन नागरिक या रस्त्याचा वापर जास्त प्रमाणात करतात. त्यामुळे शिवार चौक येथे नेहमीच वाहनांची वर्दळ असते. यामुळे या चौकात नेहमीच वाहतूक कोंडी होत असते. याचा नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत होता. याबाबत परिसरातील नागरिकांनी व सोसायटीतील रहिवासी यांनी देखील या वाहतुक कोडी बाबत माजी विरोधी पक्षनेते नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे व नगरसेविका सौ. शितलताई नाना काटे यांच्याकडे तक्रारी करीत होते. त्यानुसार नाना काटे यांनी वेळोवेळी वाहतुक विभाग व संबधित महापालिकेच्या बीआरटीएस विभागाशी चर्चा करून वाहतुक कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी व नागरिकांची वाहतूक कोंडीतून सुटका करण्यासाठी शिवार चौकातील सर्कल काढण्याच्या सुचना केल्या होत्या. यानुसार काल मध्यरात्री महापालिकेच्या बीआरटीएस विभाग व वाहतुक पोलीस विभाग यांच्या वतीने शिवार चौक याठिकाणी असलेला सर्कल काढुन टाकण्यात आला. त्यामुळे आता शिवार चौकातील वाहतुक कोडीतुन नागरिकांची सुटका होणार आहे. नाना काटे यांनी दाखवलेली तत्परता आणि नागरिकांना वाहतुक कोंडीतुन सुटका केल्याबद्दल नागरिकांनी नाना काटे व शितलताई काटे यांचे आभार मानले आहेत.

# समाविष्ट 34 गावांचा शास्तीकर माफ करा

## आपले पुणे संस्थेची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्याकडे मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

महानगरपालिका हद्दीत समाविष्ट असणाऱ्या ३४ गावांमध्ये नागरी सुविधांची वाणवा आहे. पायाभूत सुविधांचा बोजवारा उडाला आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेप्रमाणे पुणे पालिकेने समाविष्ट ३४ गावातील नागरिकांचा शास्तीकर तातडीने माफ करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

समाविष्ट ३४ गावांमध्ये महापालिकेला अद्याप आवश्यक सेवा देणे शक्य झालेले नाही. त्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेप्रमाणे पुणे महापालिकेने समाविष्ट ३४ गावातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी तातडीने शास्तीकर माफ करावा आणि तसा अध्यादेश काढावा, अशी मागणी आपले पुणे या संस्थेचे उज्वल केसकर, सुहास कुलकर्णी, प्रशांत बधे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याकडे केली आहे.

पुणे महापालिकेच्या हद्दीत नव्याने ३४ गावांचा समावेश करण्यात आला आहे. समावेशानंतर या गावांचा विकास होईल, असे सांगण्यात आले होते. परंतु या गावांतील नागरिकांना पायाभूत सुविधा मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. रस्ते, पाणी आणि वीज या सेवाही पुरेशा प्रमाणात देण्यात आलेल्या नाहीत. असे असतानाही महापालिकेकडून गावकऱ्यांकडून मिळकतकर वसूल केला जात आहे. त्या सोबतच शास्तीकर लावला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये शास्तीकर माफ केला आहे. त्याच धर्तीवर पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्येही शास्तीकर माफ करावा, अशी मागणी केली आहे. या गावांचा खडकवासला, भोर, मुळशी, पुरंदर, वडगाव शेरी , हडपसर मतदारसंघात समावेश आहे. या विधानसभा मतदारसंघातील आमदार पाहता शासनाने हा निर्णय तातडीने घ्यावा असे केसकर यांचे म्हणणे आहे.




### नागरिकांना नोटीस देण्याचे सत्र चालू

» गावे ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती यांच्या अधिपत्याखाली होती. उक्त कायद्याच्या कलम १२९ एक प्रमाणे त्यांना तरतुदी लागू असतात. त्याची देखील मांडणी प्रशासनाने चुकीची केल्यामुळे नागरिक अस्वस्थ आहेत. या सर्व पार्श्वभूमीचा विचार करता लोकसभेच्या वेळेला तात्पुरती स्थगिती दिली होती. आता लोकसभेच्या निवडणुका संपल्या असून प्रशासनाने पुन्हा या गावातील नागरिकांना नोटीस देण्याचे सत्र चालू केले आहे. त्यामुळे शास्तीकर माफ करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत पुणे महापालिकेच्या मिळकतकर विभागाशी संपर्क साधला असता कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

अकरा गावांचा प्रारूप विकास आराखडा नियमाप्रमाणे प्रशासनातील अधिकाऱ्यांनी तयार केला होता. नियोजन प्राधिकरण अस्तित्वात नसल्याने प्रशासकाने तो मान्य करण्यास तयारी दर्शवली नाही. राज्य शासनाकडे मुदतवाढ मागितली. नियमाप्रमाणे राज्य शासन मुदतवाढ देऊ शकत नाही. त्यामुळे एमआरटीपी कायदा कलम २१ (४) अन्वये हा प्रारूप विकास आराखडा पुढील प्रक्रियेसाठी सहसंचालक पुणे विभाग यांच्याकडे पाठवला गेला. त्याच्यावर पुढची प्रक्रिया सुरू आहे. २३ गावे राजकीय कारणांसाठी पीएमआरडीए मधून ३० जून २०१९ रोजी बाहेर काढली अन् पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट केली. त्यांचा प्रारूप विकास आराखडा तयार करण्यासाठी पीएमआरडीएने विशेष नियोजन प्राधिकरण नेमले. मात्र, ते बेकायदेशीर आहे. तो विषय न्यायप्रविष्ट असल्यामुळे यावर जास्त आम्ही भाष्य करणे योग्य नाही. पुणे महानगरपालिकेच्या शेजारील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये मिळकतकरांवरील शास्तीकर माफ केला आहे. एमएमसी कायदा कलम २६७ (ए) प्रमाणे अनधिकृत बांधकाम किंवा परवानगी न घेता केलेले बांधकाम असेल तर मिळकतकर दुप्पट लावण्याची तरतूद आहे. उक्त कायद्याच्या परिशिष्ट आठमधील मिळकतकराच्या तरतुदीनुसार दोन टक्के मासिक व्याज लावण्याची तरतूद आहे, असे केसकर यांनी सांगितले.

### ...तर 900 कोटींचा शास्तीकर माफ

» महापालिकेत समाविष्ट ३४ गावांचा शास्ती कर माफ करण्याच्या हालचाली शासन स्तरावर सुरू आहेत. पिंपरी-चिंचवड पालिकेच्या धर्तीवर शास्तीकर माफचा निर्णय झाल्यास ही रक्कम तब्बल ९०० कोटी रूपयांची होइल.

### लाभ सर्वसामान्यांना नव्हे तर व्यावसायिकांनाच

» शासनास केवळ गावांपुरता निर्णय न घेता संपूर्ण पुणे शहरासाठी हा निर्णय घ्यावा लागणार आहे. शासनाने या पूर्वीच १ हजार चौरस फूटा पर्यंतच्या निवासी मिळकतींना एकपट कर आकारणीचे आदेश काढले आहेत. यापुढील बांधकामासाठी दिड पट कर आकारला जातो. मात्र, थकबाकी असलेले सर्व व्यावसायिक असल्याने शासनाच्या निर्णयाचा लाभ सर्वसामान्यांना नव्हे तर व्यावसायिकांनाच मिळणार आहे.

# च-होलीतील भाजी मंडईच्या कामाला 'चालना'

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचे अधिकाऱ्यांना निर्देश, सामाजिक कार्यकर्ते सचिन तापकीर यांच्या पाठपुराव्याला यश

**पुणे | प्रतिनिधी**

झपाट्याने विस्तारलेल्या च-होली परिसरातील म्हसोबा चौकातील भाजी मंडईचा प्रश्न अखेर सुटणार आहे. भाजी विक्रेत्यांची अडचण सोडविण्यासाठी मंडईतील स्वच्छतागृहासह उर्वरित कामे तत्काळ पूर्ण करण्याचे निर्देश आमदार महेश लांडगे यांनी महापालिका अधिकाऱ्यांना दिले. भाजी मंडईसाठी सामाजिक कार्यकर्ते सचिन तापकीर यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

महापालिकेत भाजपाची सत्ता आल्यानंतर समाविष्ट भागातील विकास कामांना चालना मिळाली. भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्हिजन 20-20 च्या माध्यमातून समाविष्ट गावांचा विकास करण्यावर भर दिला. पाणीपुरवठयासह सर्व सोयी सुविधा सक्षमपणे उपलब्ध झाल्या. परिणामी, या भाग झपाट्याने विस्तारला. मोठ मोठ्या गृहनिर्माण संस्था झाल्या. त्यामुळे या परिसरातील लोकसंख्येत मोठी वाढ झाली.

वाढत्या नागरिकांसाठी भाजीपाला खरेदी करण्याकरिता च-होली बुद्रूक परिसरातील म्हसोबा चौकामध्ये भाजी मंडई उभारण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते सचिन तापकीर यांनी



महापालिका प्रशासन आणि आमदार महेश लांडगे यांच्याकडे केली होती. त्यानुसार भाजी मंडईचे काम हाती घेण्यात आले. मंडईचे बहुतांश काम पूर्ण झाले आहे. परंतु, स्वच्छतागृहाची सुविधा नव्हती. यासह किरकोळ कामे शिल्लक होती. यामुळे भाजी विक्रेत्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत होते. याची दखल घेत आमदार लांडगे यांनी जागेवर जाऊन कामाची पाहणी केली. अधिकाऱ्यांना बोलावून घेत तत्काळ काम पूर्ण करण्याचे आदेश दिले.

> च-होली परिसर झपाट्याने विस्तारला आहे. या भागातील नागरिकांची भाजी मंडईची मागणी होती. त्यानुसार आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकारातून मंडईचे काम पूर्णत्वास आले. लवकरच मंडई सुरू केली जाईल. त्यामुळे नागरिक आणि भाजी विक्रेत्यांची अडचण दूर होणार आहे.
>
> **- सचिन तापकीर, सामाजिक कार्यकर्ते, चऱ्होली.**

# फुलांची आकर्षक आरास अन् विद्युत रोषणाई

(पान १ वरून)

आकर्षक विद्युत रोषणाई येथील जय भारत चौकातील जय भारत प्रतिष्ठान या मंडळाने भव्य गणेश मूर्तीची स्थापना केली असून फुलांची आकर्षक सजावट आणि विद्युत रोषणाई केली आहे. शैक्षणिक, सामाजिक कार्यक्रम श्री कॉलनी येथील श्री नागेश्वर प्रतिष्ठान, नागेश्वरनगर कॉलनी क्र. २ येथील मंडळाने भौगोलिक देखाव्यावर भर दिला असून चंद्रावर बसलेल्या भव्य गणेश मूर्तीची स्थापना केली आहे. विविध शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अवकाशातील अंतराळयान देहू-आळंदी बीआरटीएस रस्त्यावरील बोराटे वस्ती येथील लक्ष्मी चौकामधील चैतन्य मित्र मंडळाने हनुमानाच्या खांद्यावर बसलेल्या भव्य गणेश मूर्तीची स्थापना केली आहे. सभोवताली भव्य अशा एलईडी स्क्रीनद्वारे अवकाशामधील अंतराळयान, अग्निबाण, अंतराळवीर सोडणाऱ्या दृश्यासह शैक्षणिक, सामाजिक, राष्ट्रीय, धार्मिक, विज्ञान अशा विविध विषयांवर एलईडी शोद्वारे समाज प्रबोधन केले जात आहेत. आकर्षक विद्युत रोषणाई मोशीतील ग्रामदैवत श्री नागेश्वर महाराज मुख्य प्रवेशद्वाराजवळील अमरवीर ज्योती तरुण मंडळाने (शिवछत्रपती चौक, मोशी गावठाण) भव्य अशा मूर्तीची स्थापना केली असून आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे. बोराटे तालीम व साईनाथ मित्र मंडळाचा बलदंड शरीरयष्टीचा गणेश तालमीसाठी प्रसिद्ध असलेल्या मोशीतील बोराटे तालीम व साईनाथ मित्र मंडळाने (मोशी गावठाण) बलदंड शरीरयष्टी असलेल्या भव्य दिव्य अशा उभ्या गणेश मूर्तीची स्थापना केली आहे. आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. अभिषेक बोराटे हे अध्यक्ष आहे. संगम मित्र मंडळाचे धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांवर भर गेल्या पन्नास वर्षांची परंपरा सांभाळत मोशी गावठाणातील संगम मित्र मंडळाने भव्य दिव्य अशा गणेश मूर्तीची स्थापना केली आहे. विविध शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्ञानेश्वर मोकाशी हे अध्यक्ष तर प्रमोद बनकर हे उपाध्यक्ष आहेत. आकर्षक विद्युत रोषणाई तालमीसाठी प्रसिद्ध असलेल्या मोशीतील श्री हनुमान तरुण मित्र मंडळ, हनुमान आळी, पत्र्याची तालीम मंडळाने भव्य दिव्य गणेश मूर्तीची स्थापना केली असून आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे. सोमनाथ हिंगणे हे अध्यक्ष आहेत. फुलांची आकर्षक सजावट आल्हाटवाडी येथील श्री सावता माळी तरुण मंडळाने फुलांच्या आकर्षक सजावटीसह वैविध्यपूर्ण गणेशमूर्तीची स्थापना केली आहे. अमृता आल्हाट हे अध्यक्ष तर, योगेश आल्हाट हे उपाध्यक्ष आहेत. वर्गणी न घेता स्थापना जुना मोशी-आळंदी रस्त्यावरील आल्हाटवाडी येथील जय बजरंग मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी बाहेरील नागरिकांकडून वर्गणी न घेता स्वतः वर्गणी देत भव्य गणेश मूर्तीची स्थापना केली आहे. तसेच आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे. सामाजिक कार्यक्रम सस्तेवाडी येथील तरुण मराठा मंडळ, सस्तेवाडी तालीम या मंडळाची १९५९ मध्ये स्थापना झाली असून मंडळाचे यंदाचे ६५ वे वर्ष आहे. हे मंडळ सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करत असते. गणेश सस्ते हे मंडळाचे अध्यक्ष असून अक्षय सस्ते हे सचिव तर विशाल सस्ते हे खजिनदार आहेत.

# अकरा ठेकेदार काळ्या यादीत; अधिकारी कारवाईविना सहीसलामत

## महापालिकेची विविध कामे निकृष्ट, दर्जाहीन केल्याबद्दल कामाचे दुप्पट पैसे वसूल करणार



**पिंपरी | प्रतिनिधी**

निकृष्ट, दर्जाहीन कामे करून पालिकेला खड्डयात घालणाऱ्या अकरा ठेकेदारांना काळ्या यादीत टाकून त्यांच्याकडून कामाच्या दुप्पट रकमेची वसुली करण्यात येणार आहे. मात्र, कामावर देखरेख करणारे कनिष्ठ अभियंता, उपअभियंता, कार्यकारी अभियंता यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही.

श्रीमंत महापालिकेची बिरुदावली मिरवणाऱ्या पिंपरी चिंचवड महापालिकेकडे सोन्याची अंडी देणारी कोंबडी म्हणून बघितले जात आहे. स्थापत्य अधिकारी, राजकारणी आणि ठेकेदार मिळून निकृष्ट, दर्जाहीन कामे करून पालिकेच्या तिजोरीवर डल्ला मारत आहेत. महापालिकेच्या स्थापत्य विषयक कामात ४० ते ४५ टक्के पेक्षा कमी दराने ठेकेदारांनी निविदा भरून निकृष्ट कामे करत लाखो रुपयांची बिले लाटली आहे.

यातील पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थापत्य विभागाकडून आठही क्षेत्रीय कार्यालय परिसरात विविध कामे करण्यात येतात. तसेच केलेल्या कामाच्या देखभालीचीही कामे करण्यात येतात. स्थापत्य विभागातील रस्ते दुरुस्ती, पेव्हिंग ब्लॉक, मातीचे जॉगिंग ट्रॅकसारखी कामे घेताना ११ ठेकेदारांनी १४ विकास कामात तब्बल ४० ते ४५ टक्के कमी दराने निविदा भरल्या होत्या. एवढ्या कमी दरात कामे घेतल्यानंतर त्याचा दर्जा, गुणवत्ता चांगली राहील का? याबाबत आयुक्त शेखर सिंह यांना खातरजमा करायची होती. त्यानुसार आयुक्त सिंह यांनी ११ ठेकेदारांच्या १४ कामांचा दर्जा अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे ( सीओईपी) यांच्याकडून तपासण्याचे आदेश महापालिका दक्षता व नियंत्रण विभागाला सप्टेंबर २०२२ मध्ये दिले होते.

दक्षता व नियंत्रण विभागाने पुण्यातील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (सीओईपी) कडून कामांची गुणवत्ता व दर्जाची तपासणी करण्यात आली. सीओईपीने केलेल्या तपासणीत पेव्हिंग ब्लॉकच्या कामात ब्लॉक खचलेले, ज्या ठिकाणी दुरुस्ती आवश्यक अशा ठिकाणी दुरुस्तीच केली नाही, महापालिका मानांकनानुसार काम झालेले नाही, रस्ते दुरुस्ती केल्यानंतर त्वरित खड्डे पडणे, रस्त्यावरील कॉंक्रिट थराची जाडी कमी असणे, जॉगिंग ट्रॅकवर कमी माती टाकणे, निविदेनुसार काम न करणे अशा शेकडो त्रुटी समोर आल्या आहेत. या तपासणीचा अहवाल आठ महिन्यांपूर्वी आयुक्तांना सादर केला होता.

दरम्यान, सीओईपीकडून स्थापत्य विषयक विविध कामांचा आलेला अहवाल दक्षता व नियंत्रण विभागाने आयुक्तांना सादर केला होता. या अहवालावर आयुक्तांकडून तत्काळ निर्णय घेतला नाही. कित्येक महिने हा अहवाल आयुक्तांनी आपल्याकडे ठेवला होता.

या अहवालानंतर महापालिकेने दर्जाहीन, निकृष्ट कामे करणा-या ११ ठेकेदारांना कारणे दाखवा नोटीस पाठविली. त्या ठेकेदारांकडून खुलासा मागवण्यात आला. त्यांचा खुलासा समाधानकारक नव्हता. यानंतर आयुक्त सिंह यांनी सर्व ठेकेदारांवर कारवाई करण्याचे आदेश शहर अभियंता यांना दिले.

त्यानुसार शहर अभियंता मकरंद निकम यांनी ११ ठेकेदारांना केवळ एका वर्षासाठी काळ्या यादीत टाकण्याचा निर्णय घेत तसा आदेश काढला आहे. तसेच ठेकेदारांकडून निकृष्ट केलेल्या कामाचा निविदा रकमेच्या दुप्पट खर्च वसूल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे ठेकेदारांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

### काळ्या यादीतील ठेकेदार

**» महापालिकेच्या स्थापत्य विषयक व देखभाल दुरुस्तीचे काम अत्यंत निकृष्ट आणि दर्जाहीन केलेल्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकले आहे. यामध्ये अजय घनश्याम खेमचंदानी, अनिकेत एंटरप्रायजेस, चैताली सप्लायर्स, कविता एंटरप्रायजेस, काव्या असोसिएट्स, मोटवानी ॲण्ड सन्स, नामदे एंटरप्रायजेस, आर. जी. मंगळवेढेकर, रामचंद्र एंटरप्रायजेस, सनसारा कन्स्ट्रक्शन, सोहम एंटरप्रायजेस या ११ ठेकेदारांना वर्षासाठी काळ्या यादीत टाकले आहे.**

# कागदपत्रांची संख्या घटल्याने दीड महिन्यात आले सव्वाशे अर्ज

## पीएमआरडीएने 44 कागदपत्रे कमी केल्याचा सकारात्मक प्रतिसाद : विकास परवाना विभागात आले अर्ज




**पिंपरी | प्रतिनिधी**

बांधकाम व्यावसायिक आणि नागरिकांसाठी परवानगी प्रक्रिया सुलभ व्हावी, प्रलंबित आणि खोळंबलेल्या अर्जांचा निपटारा व्हावा यासाठी पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए ) तब्बल ४४ कागदपत्रे कमी केली होती. आयुक्त योगेश म्हसे यांनी हा निर्णय घेऊन जवळपास दीड महिना उलटला. या दरम्यान पीएमआरडीए कार्यालयातील विकास परवानगी विभागात तब्बल १२५ अर्ज दाखल झाले आहेत.

गतकाळातील संख्येचा विचार करता तुलनेने संख्या वाढली असल्याचे येथील अधिकाऱ्याने सांगितले. तूर्तास अर्जांची त्याची छाननी सुरू आहे. पीएमआरडीएमध्ये बांधकाम परवानगी व विविध ९ कारणांसाठी नागरिकांना १३३ प्रकारची कागदपत्रे द्यावी लागत होती. आता यामध्ये सुटसुटीतपणा आणल्याने फक्त ८९ कागदपत्रेच द्यावी लागणार आहेत. पर्यायाने ४४ कागदपत्रे कमी झाली आहेत. त्यामुळे यावर निर्णय घेणेदेखील सोपे झाले आहे.

पीएमआरडीएकडून हाताळल्या जाणाऱ्या प्रत्येक प्रकरणांमध्ये आवश्यकतेनुसार विविध कागदपत्रे जोडणे गरजेचे असते. मात्र, प्रथम आवश्यक ती कागदपत्रे जोडणे गरजेची असल्याने त्याबाबत आयुक्तांनी जुलै महिन्याच्या आदेश काढले होते. त्याशिवाय, बांधकाम परवानगीचे अर्ज जमा करण्यापूर्वी संबंधित क्षेत्राचे साहाय्यक महानगर नियोजनकार/रचना साहाय्यक यांच्याकडून सर्व कागदपत्रे जोडले असल्याची पडताळणी केली जाणार असल्याने ते कार्यालयात पडून राहणार नाहीत, याची दक्षताही घेण्यास सांगितले होते.

प्राधिकरणाकडून हाताळल्या जाणाऱ्या प्रत्येक प्रकरणांमध्ये आवश्यकतेनुसार वेगवेगळी कागदपत्रे जोडणे गरजेचे असते. या बाबींमध्ये अधिक सुटसुटीतपणा येण्याकरता प्रकरणांमध्ये यापूर्वी मागणी करण्यात येत असलेली बरीच कागदपत्रे कमी करून किमान आवश्यक असतील एवढीच कागदपत्रे मागविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे नागरिकांचा वेळ व पैशांची बचत होणार आहे. त्याचप्रमाणे आवश्यक ती कागदपत्रे जोडली गेल्याने नागरिकांचे हेलपाटेही वाचणार आहेत.

### व्यावसायिकांना दिलासा

**» पीएमआरडीएमध्ये यापूर्वी अर्जदारांना वेगवेगळ्या प्रकारची कागदे, नोंदी आणि अग्निशमन ना हरकत तसेच, वृक्ष समितीची परवानगी लागत होती. परिणामी अनेक अर्ज या कारणामुळे प्रलंबित राहात होते. अनेक अर्ज पुढे सादर होत नव्हते. त्यामुळे त्यावरती आक्षेप वाढत असल्याने त्या फायली तेथेच पडून असत. दरम्यान, आता ही कागदपत्रे जोडली नसली तरी, प्रकरणे दाखल करण्याबाबत सूचना दिल्या गेल्या आहेत. मात्र, संबंधित प्रस्तावावर अंतिम निर्णय झाल्यानंतर या दोन्ही विभागाची परवानगी आवश्यक असणार आहे.**

# शहरातील प्रमुख रस्ते सायंकाळी पाचनंतर वाहतुकीस बंद

## लक्ष्मी रस्ता, शिवाजी रस्ता, बाजीराव रस्ता, टिळक रस्ता वाहतुकीस बंद : नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशोत्सवादरम्यान देखावे पाहण्यासाठी शहरात मोठ्या प्रमाणावर होणारी गर्दी विचारात घेता वाहतूक पोलिसांनी मध्यवस्तीमधील संध्याकाळच्या वेळेत रस्ते बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. बुधवारपासून (दि. ११) शहराच्या मध्य भागातील प्रमुख रस्ते सायंकाळी पाचनंतर वाहतुकीस बंद करण्यात येणार आहेत.

लक्ष्मी रस्ता, शिवाजी रस्ता, बाजीराव रस्ता, टिळक रस्ता वाहतुकीस बंद केले जाणार आहेत. वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.

घरगुती गणपती आणि गौरी विसर्जनानंतर सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणपतींच्या दर्शनासाठी आणि देखावे पाहण्यास गर्दी होते.



बुधवारपासून शहराच्या मध्य भागात गर्दी होण्याच्या शक्यता असल्याने वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आले आहेत. हे बदल विसर्जन मिरवणुकीपर्यंत राहणार आहेत.

अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळता अन्य सर्व वाहनांसाठी सायंकाळी पाचनंतर मध्य भागातील प्रमुख रस्ते बंद ठेवण्यात येणार आहेत. गर्दी ओसरेपर्यंत मुख्य रस्ते बंद असतील. नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी केले आहे.

### या भागात वाहने लावण्यास मनाई

शिवाजी रस्त्यावरील जिजामाता चौक ते मंडई, मंडई ते शनिपार, शनिपार ते फुटका बुरुज, अप्पा बळवंत चौक ते बुधवार चौक या भागात वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे.

### बंद असणारे अंतर्गत रस्ते

» सिंहगड गॅरेज (घोरपडे पेठ ते राष्ट्रभूषण चौक ते हिराबाग चौक), दिनकरराव जवळकर चौक ते पायगुडे चौक ते हिराबाग चौक, कै. अनंत बाळकृष्ण नाईक पथ ते टिळक रस्ता, सणस रस्ता (गोटीराम भैय्या चौक, मंडई ते गोविंद हलवाई चौक), पानघंटी चौक ते गंज पेठ पोलीस चौकी, गंज पेठ ते वीर लहुजी वस्ताद तालीम चौक, गायकसाब मशीद ते सेंटर स्ट्रीट पोलीस चौकी (लष्कर), कोहिनूर चौक ते बाबाजान चौक (लष्कर), जेधे प्रासाद रस्ता, सुभानशाह दर्गा, पार्श्वनाथ चौक, शास्त्री चौक ते सोन्या मारुती चौक, गुरुनानक पथ ते हमजेखान चौक (देवजीबाबा चौक, गणेश पेठ).

### वाहतुकीस बंद असणारे रस्ते

» लक्ष्मी रस्ता (हमजेखान चौक ते टिळक चौक), शिवाजी रस्ता (गाडगीळ पुतळा चौक ते देशभक्त केशवराव जेधे चौक, स्वारगेट), बाजीराव रस्ता (पूरम चौक ते अप्पा बळवंत चौक), टिळक रस्ता (मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ते हिराबाग चौक).

# ऐतिहासिक भिडे वाडा स्मारकाच्या कामाला थेट सुरुवात

## भूमिपूजनाचा घाट न घालता थेट कामाला हात घालत महात्मा फुले यांच्या विचारांना पालिका जागली

**पुणे | प्रतिनिधी**

महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा जेथे सुरू केली त्या शिवाजी रस्त्यावरील ऐतिहासिक भिडे वाड्याच्या राष्ट्रीय स्मारकाच्या कामाला महापालिकेने थेट सुरुवात केली आहे. त्यासाठी कोणताही भूमिपूजनाचा घाट न घालता थेट कामाला हात घालत महात्मा फुले यांच्या विचारांना पालिका जागली आहे.

देवाची भक्ती, पूजा, उपासना वगैरेंसाठी तसेच धर्मविधी करताना मला कोणाही मध्यस्थाची गरज नाही, असे महात्मा फुले यांनी सांगितले होते. त्यामुळे पालिकेच्या प्रकल्प विभागाने स्मारकाच्या माध्यमातून महात्मा फुले यांचा विचार पुढे नेला असून कोणाही मध्यस्थाच्या हातून पूजा होणार नाही. कोणताही वाद होईल, असा निर्णय न घेता थेट कामाला सुरुवात केली आहे. या निर्णयामुळे पालिकेचे कौतुक केले जात आहे. भिडे वाड्याची जागा हस्तांतरित करण्यासाठी पालिकेला न्यायालयीन लढाई लढावी लागली होती. न्यायालयाने महापालिका आणि राज्य सरकारच्या बाजूने निकाल दिला आहे. हा निकाल हाती येताच पालिकेने एकाच रात्री वाड्याची जागा ताब्यात घेतली. भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात कधी केली जाणार याकडे लक्ष लागून राहिले होते. भिडेवाडा स्मारकाचे संकल्पचित्रही प्रशासनाने तयार केले होते. मात्र, त्यात बदल सुचवण्यात आले होते. सध्या बेसमेंटच्या कामाचे संकल्प चित्र तयार करण्यात आले आहे. प्रत्यक्षात स्मारक कसे असेल याची प्रतिकृती लवकरच जाहीर केली जाईल असे प्रकल्प विभागाने सांगितले.




महापालिकेने भूसंपादनाची प्रक्रिया सुरू केल्यानंतर १३ वर्षांपूर्वी या वाड्याचे जागा मालक आणि पोटभाडेकरू नुकसान भरपाईवरून महापालिका आणि राज्य शासनाविरोधात उच्च न्यायालयात गेले होते. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून स्मारकाचा प्रश्न प्रलंबित राहिला होता. सर्वोच्च न्यायालयाने महापालिका आणि राज्य शासनाच्या बाजूने निकाल दिल्यानंतर पालिकेने यापूर्वी केलेल्या निकालानुसारच जागेचा मोबदला देण्याचे आदेश दिले आहेत. हे आदेश देताना २०१३ मध्ये नव्याने आलेल्या भूसंपादन कायद्यानुसार फरकाची रक्कमही देण्यात यावी असे आदेशात नमूद केले होते. यासाठी पालिका पूर्वीपासूनच तयार असल्याने स्मारकाच्या कामातील सर्व अडचणी दूर झाल्या आहेत.

### असे असेल संकल्पचित्र

» भिडेवाडा सुमारे २ हजार चौ. फुटांचा आहे. तळ मजल्यावर क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुतळा.

» सुमारे ६३३ चौ. फुटांच्या वर्ग खोलीत मुलींना शिकविताना सावित्रीबाई फुले. ३६३ चौ. फुटांचे मुख्याध्यापकांचे कार्यालय. तसेच एक १२३ चौ. फुटांची खोली असेल.

» पहिल्या मजल्यावर ६६३ चौ. फुटांचा बहुद्देशीय हॉल, लायब्ररी आणि माहितीदर्शक फलक, स्टाफ रूम

» दुसऱ्या मजल्यावर असेंम्बली हॉल आणि वर्ग खोली

» प्रत्येक मजल्यावर महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह

» पूर्वीप्रमाणेच हा वाडा दुमजली आणि त्याच रूपात उभारण्यात येणार असून छत कौलारू असेल

» संकल्पचित्रास वरिष्ठ पातळीवर चर्चा करून त्याला अंतिम स्वरूप दिले जाणार

> भिडे वाडा स्मारकाच्या कामाला थेट सुरुवात करण्यात आली आहे. महात्मा फुले यांचे विचार पुढे नेत भूमिपूजन करण्याऐवजी थेट कामाला सुरुवात करावी, असे मत मांडण्यात आले होते. स्मारकासाठी महापालिकेने साडे आठ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात स्मारक असल्याने सध्या गणेशोत्सवानिमित्त होणारी गर्दी विचारात घेता स्मारकाच्या कामासाठी अडथळा येत आहे. त्यामुळे वाहतूक पोलिसांनी दहा दिवस काम थांबवण्याची सूचना केली आहे.
>
> **- युवराज देशमुख, मुख्य अभियंता, प्रकल्प विभाग, पुणे महापालिका.**